# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-४७** **दिनांक - १५/०२/२०२४**

## कर्जबाजारीपणामुळे अपहरण व खंडणीचा बनाव करणा-या इसमाचा शोध घेण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश

आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ६६/२०२४ भा.द.वि.सं कलम ३८५, ३८७ प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी अनिकेस अमृतलाल विश्वकर्मा वय २४ वर्षे व्यवसाय- कारपेंटर रा. रुम नं.४ लक्ष्मी निवास आदर्शनगर -सर्व्हे नं.१११ नालेश्वर मंदिर जवळ अलकापुरी नालासोपारा पुर्व ता.वसई जिल्हा पालघर यांनी त्यांचा अपहृत भाऊ अनुप अमृतलाल विश्वकर्मा वय २८ वर्षे, रा. सदर याचे दिनांक १२/०२/२०२४ रोजी रात्रौ ०९.०० वाजताचे दरम्यान त्यांचे राहते घरातुन कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण करुन त्यास जीवेठार मारण्याची भिती घालुन १ लाख रुपये खंडणीची मागणी केल्याबाबत फिर्यादी यांनी आचोळे पोलीस ठाण्यात दि.१३/०२/२०२४ रोजी २१.३७ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर खंडणीसाठी घडलेल्या अपहरणाचे गुन्हयाची बातमी प्राप्त होताच मा. वरीष्ठांच्या आदेश व सुचनांप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष -२ वसई कार्यालयाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे यांचे मार्गदर्शनाखाली यनिट अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन गुन्हयातील अपहृत व्यक्तीशी कोणाचे असलेले वैर अगर त्यांचे आर्थिक व्यवहार याला अनुसरुन गुन्हयाचा प्रकार घडला आहे अगर कसे या दिशेने तपास चालू झाला. गुन्हयातील अपहृत व्यक्तीचा व अपहरणकर्त्याचा शोध घेण्याचे अनुषंगाने गुन्हयातील अपहृत व्यक्तींचे मोबाईलचे तांत्रिक विश्लेषणाव्दारे त्याचे मोबाईलचे लोकेशन हे दादर रेल्वेस्टेशन येथे असल्याचे दिसुन आले. पोलीस पथक दादर येथे रवाना करुन अपहृत व्यक्तीचे मोबाईलचे लोकेशन ट्रेस करीत असताना अपहृत व्यक्ती नामे अनुप अमृतलाल विश्वकर्मा वय २८ वर्षे रुम नं.४ लक्ष्मी निवास आदर्शनगर -सर्व्हे नं.१११ नालेश्वर मंदिर जवळ अलकापुरी नालासोपारा पुर्व ता.वसई हा दादर रेल्वे स्टेशन येथे बसलेला मिळून आला. त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे गुन्हयातील अपहरणकर्ता व्यक्ती व त्यास अपहरण केल्या नंबर डांबुन ठेवलेल्या ठिकाणांबाबत चौकशी करीत असताना अपहृत व्यक्तीचे कथनात साशंकता जाणवली. त्यानंतर त्यास विश्वासात घेवून माहीती घेतली असता अपहृत व्यक्ती अनुप अमृतलाल विश्वकर्मा याने प्रीपेअर-क्रेडीट विदया लोन यांचेकडुन गेल्या २ वर्षापुर्वी ९४,०००/- रुपयेचे लोन घेतले होते. सदर लोनचे हप्ते भरणेकरीता एस डब्ल्यू ओ टी कन्सल्टन्सी, अंधेरी यांचे रीकव्हरी एजंट श्री राजेश शेट्टी हे त्यांचे मोबाईल नं ८९७६६६६९१३ यावरुन अपहृत व्यक्तींना वांरवार वसूलीकरीता घरपर्यंत येण्याची व मारण्याची धमकी देत असल्याने लोनचे पैसे फेडते करणेकरीता अपहृत व्यक्तीने स्वत:चे अपहरण व खंडणीचा बनाव आखला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर व्यक्तीस पुढील कार्यवाही करीता आचोळे पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.श्री अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर प्रकाश शिंदे, सहा.फौज.रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. रविंद्र पवार, प्रफुल्ल

पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदिश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पो.अं. अमोल कोरे, मसुब/अविनाश चौधरी सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई, सहा.फौज- संतोष चव्हाण नेम- सायबर गुन्हे शाखा, स.पो.नि. स्वप्नील विष्णुपंत पाटील नेम- शिवाजी पार्क पोलीस ठाणे मुंबई, पो.अं. व्ही एच शेलार, आर पी गव्हार, आर बी पवार, ए आर ढवळे S.R.P.F. गट क्र ११ यांनी केली आहे.

